महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२०००५एसजीसी१५३६४५
दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in
प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

**पी-कॉम/घरगुती वीज जोडणी /३३९०५** **दिनांक :११/११/२०१६.**

## वाणिज्य परिपत्रक क्र.२७४

**विषय :- घरगुती वीज जोडणी देण्याबाबत.**

**संदर्भ :-** शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०१६/प्र.क्र.२६५/ऊर्जा-५ दिनांक १८ ऑक्टोबर २०१६.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ४३ मध्ये, कोणत्याही जागेच्या मालकाने अथवा वहिवाटदाराने वीज जोडणीसाठी अर्ज केल्यास अशा जागेस वीज वितरण लायसनदाराकडून वीज पुरवठा करण्याबाबतची तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता व पुरवठयाच्या इतर अटी), विनियम, २०५ अन्वये विनियम-४ मध्ये, अर्जदाराने घरगुती वीज जोडणीकरिता मागणी करताना सादर करावयाच्या पुराव्यांबाबतचा तपशील नमूद करण्यात आलेला आहे.

असे निदर्शनास आले आहे की, काही ठिकाणी सदर पुराव्यांव्यतिरिक्त विशिष्ट पुराव्यांची तसेच नाहरकत प्रमाणपत्राची मागणी करतात व त्याशिवाय सदर जागेस वीज जोडणी / पुरवठा करीत नाहीत. याबाबत याद्वारे असे सूचित करण्यात येते की, राज्यातील कोणत्याही ठिकाणी अर्जदाराने त्याच्या अधिकृत ओळखपत्रासह (फोटोसहित) व त्याच्या वास्तव्यासंबंधीचा अधिकृत पुरावा जोडून वीज जोडणीसाठी, आवश्यक ते शुल्क भरुन विनियमानुसार रीतसर परिपूर्ण अर्ज केल्यास व कोणतेही कायदेशीर निर्बंध नसल्यास, अशा जागेस वीज जोडणी देण्यात यावी. अशा ठिकाणी वीज जोडणी देऊन वीज पुरवठा सुरु केल्यानंतर सदरची जागा संबंधित सक्षम प्राधिकरणाने अनधिकृत ठरवून निष्कासित केल्यास (रिक्त केल्यास), अशा जागेचा वीज पुरवठा तात्काळ खंडीत करण्यात यावा. तसेच अशा जागेस वीज वितरण कंपनीकडून विहित कार्यपध्दतीनुसार वीज जोडणी दिल्यास केवळ ही बाब ती जागा अधिकृत असल्याबाबतचा पुरावा आहे असे ग्राहय धरता येणार नाही किंवा अशा ठिकाणच्या वीज देयकाचा वापर सदरची जागा अधिकृत ठरविण्यासाठी पुरावा म्हणून ग्राहय धरता येणार नाही, या अटींवर संबंधित जागेस वीज जोडणी देण्यात यावी.

सदर बाबतीत सर्व क्षेत्रिय कार्यालयांनी तातडीने अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

(सही) 15.11.16
**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत रवाना :- प्रेषण यादिप्रमाणे**